महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९३ वा | दिनांक : २१/०९/२०२५ | वार : रविवार

## राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घ्या : तुकाराम मुंढे



**मुंबई :** आपल्या धडाडीच्या कामासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा एकदा ॲक्शन मोडवर आले आहेत. सध्या राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असलेल्या मुंढे यांनी, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र वापरून सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्यांविरुद्ध मोठी मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना यासंदर्भात लेखी आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार, जिल्हा परिषदेतील शिक्षण, आरोग्य, बांधकाम यासह सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. या आदेशामुळे बोगस प्रमाणपत्र वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

तुकाराम मुंढे यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून त्यांच्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. त्यांना समाजात योग्य स्थान मिळवून देणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आपले कर्तव्य आहे. 'समावेशन, सन्मान आणि समान संधी' यावरच खऱ्या अर्थाने सक्षम समाजाची पायाभरणी होते, असेही त्यांनी म्हटले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, बोगस दिव्यांग व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. दिव्यांग कल्याण विभागाकडे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत, ज्यात अनेक कर्मचारी बोगस दिव्यांगत्वाचा लाभ घेत असल्याचे म्हटले आहे. या तक्रारींची दखल घेऊन मुंढे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना महिन्याभरात तपासणीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

जर एखाद्याचे प्रमाणपत्र बनावट किंवा चुकीचे आढळले, किंवा दिव्यांगत्वाचे प्रमाण 40 टक्क्यांपेक्षा कमी असेल, तर अशा कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ तात्काळ बंद करावेत आणि त्यांनी आतापर्यंत घेतलेल्या लाभांवर कारवाई करावी, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या मोहिमेमुळे खऱ्या दिव्यांगांना त्यांच्या हक्कांपासून वंचित राहावे लागणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मोदी मित्र ट्रम्प यांनी भारताविरोधात मूक युद्ध छेडले : ॲड. प्रकाश आंबेडकर



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मित्र असलेले अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात मूक युद्ध पुकारल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रथम भारतावर ५० टक्के शुल्क वाढवले. त्यानंतर आता एचवनबी व्हिसा शुल्कात भरमसाठ वाढ करत भारताविरोधात मूक युद्ध छेडले आहे, असे ते म्हणालेत.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी H१B शुल्कात भरमसाठ वाढ केली आहे. पूर्वी या व्हिसासाठी कंपन्यांना वार्षिक ६ लाख रुपये भरावे लागत होते. पण आता ट्रम्प यांच्या आदेशामुळे हे शुल्क वार्षिक १ लाख डॉलर्स अर्थात ८३ लाख रुपयांवर पोहोचले आहे. ट्रम्प यांच्या या आदेशामुळे अमेरिकन टेक कंपन्या व परदेशी कर्मचारी विशेषतः भारतीय आयटी प्रतिभावंतांना मोठा झटका बसणार असल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकरांनी पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, पंतप्रधान मोदींचे मित्र ट्रम्प यांनी आपल्या देशाविरोधात मूक युद्ध पुकारले आहे. प्रथम अमेरिकेने पाकिस्तानला झुकते माप दिले. भारताकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या लष्करप्रमुखांना थेट व्हाईट हाऊसमध्ये जेवणासाठी निमंत्रित केले. नंतर भारतावरील शुल्क ५० टक्के वाढवण्याची घोषणा केली. त्यानंतर आता ट्रम्प यांनी H१B व्हिसा शुल्कात भरमसाठ वाढ केली आहे. याचा सर्वात मोठा फटका भारतीय टेक टॅलेन्टला बसेल. हे भारताविरोधातील एक मूक युद्ध आहे. यासाठी पंतप्रधान मोदी जबाबदार आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे प्रकाश आंबेडकरांनी अमेरिकेच्या टॅरिफमुळे लवकरच भारतात नेपाळसारखी स्थिती उद्भवण्याची भीतीही व्यक्त केली होती. भारताचा शेजारी देश असणाऱ्या नेपाळमध्ये तरुणांनी आंदोलनाच्या माध्यमातून सत्ता उलथवून टाकली. भारतातही सरकारच्या ध्येयधोरणांमुळे अशीच परिस्थिती उद्भवू शकते. सध्या राज्यकर्ते पार घाबरले आहेत. त्यामुळे पुढील दोन महिन्यात देशात नेपाळसारखी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता नाही, असे ते म्हणाले होते.

अमेरिकेसोबतच्या परराष्ट्र धोरणावर केंद्र सरकार भारतीयांना गंडवत आहे. अमेरिकेने लादलेले ५० टक्के टॅरिफ कमी झाले नाही, तर सध्याच्या आकडेवारीनुसार एकट्या टेक्स्टाईल इंडस्ट्रीतील १ कोटी १० लाख कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळेल. तसेच गुजरातमध्ये असलेली जेम्स अँड ज्वेलरीच्या उद्योगातील १० लाख कर्मचारीही बेरोजगार होतील. अमेरिकेच्या टॅरिफचे भीषण परिणाम आता दिसून येत आहेत, असे ते म्हणाले होते.

## रिपाई खरात गटाचे अध्यक्ष सचिन खरातांना धमकी

**मुंबई :** मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, रिपब्लिकन पार्टी खरात गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांच्याबद्दल सोशल मीडियावर अपमानास्पद वक्तव्य करत, त्यांच्या तोंडाला काळे फासण्याची धमकी देण्यात आली आहे. या धमकीनंतरही आपण आपली भूमिका कायम ठेवणार असल्याचे सांगत, धमक्यांना भीक घालणार नसल्याचे सचिन खरात यांनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार यांनी देखील या प्रकरणाची दखल घेतली असून, सचिन खरात यांना पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे.

नेमके काय म्हणाले सचिन खरात?

मी महाराष्ट्रात रयतेचे राजे शिवाजी महाराज, संभाजी राजे, फुले, शाहू, आंबेडकर, अहिल्यादेवी होळकर यांचा विचार सातत्याने मांडत आहे. मी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना, आमचे परभणीचे जिल्हाध्यक्षांनी मला सोशल मीडियावरची पोस्ट दाखवली. त्या पोस्टमध्ये एका व्यक्तीने माझ्या परिवाराबद्दल अतिशय खालच्या शब्दांत उल्लेख करून चुकीची विधाने केलेली आहेत. तसेच मला लवकरात लवकर काळे फासण्यात येईल, असा इशारा देखील दिलेला आहे, असे सचिन खरात यांनी सांगितले.

मला कुणाला घाबरण्याची गरज नाही

मात्र, मी याकडे दुर्लक्ष करत आहे. कारण मी राज्यात फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार मांडत आहे. त्यामुळे मी मला कुणाला घाबरण्याची गरज नाही. याप्रकरणी आमच्या पक्षाच्या सर्व जिल्हाध्यक्षांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवदने देत धमकी देणाऱ्या व्यक्तीवर कारवाईची मागणी केली आहे. सोशल मीडियावरून धमकी देण्याचे प्रकार सातत्याने होत असल्याचे सचिन खरात यांनी सांगितले.

धमकी देण्यामागचे कारण काय?

राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणावर वाद सुरू आहे. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशी माझी भूमिका मांडलेली आहे. काहींना माझ्या या भूमिकेबद्दल काही वाटत असावे, त्यामुळे हा प्रकार सुरू असल्याची शंका सचिन खरात यांनी व्यक्त केली. परंतु, माझी भूमिका मी कायम ठेवणार आहे, असे सचिन खरात यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

खरातांना पोलिस संरक्षण पुरवा - सुप्रिया सुळे

दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, सचिन खरात यांना पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. आपल्या पोस्टमध्ये सुप्रिया यांनी लिहिले की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांना धमक्या येत आहेत. यासंदर्भातील पत्र प्राप्त झाले आहे. तसेच रिपाई (सचिन खरात गट) यांच्या पक्षाच्या वतीने ते मुख्यमंत्री महोदय तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनाही पत्र पाठविण्यात आले आहे. या पत्राची योग्य ती दखल घेऊन रिपब्लिकन नेते सचिन खरात यांना पोलिस संरक्षण पुरविण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५


## संत बहिणाबाई यांच्या साहित्यावर एक दिवशी राज्यस्तरीय चर्चासत्र

**कन्नड :** त्रैमासिक तिफण, संत तुकाराम अध्यासन केंद्र, शिवाजी महाविद्यालय कन्नड, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद , मराठी विभाग मत्स्योदरी महाविद्यालय अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई यांच्या साहित्यावर आधारित एक दिवशी चर्चासत्राच्या आयोजन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला, व वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अंबड येथे करण्यात आले आहे. (ता. २३ सप्टेंबर ) चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन राज्याचे माजी मंत्री मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रमुख मा. राजेश भैय्या टोपे यांच्या शुभहस्ते होणार आहे. संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सतीश बडवे यांचे बीज भाषण असणार आहे.

तर शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. मानसिंग बापू पवार हे या चर्चासत्राचे अध्यक्ष असणार आहेत. भाषा, साहित्य, संस्कृती संशोधन परिषदेचे अध्यक्ष डाॅ. सर्जेराव जिगे, शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डाॅ. बी. आर. गायकवाड , प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, डॉ. रविंद्र पाथरे, राहुल भालेकर , प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे दिवसभर चालणाऱ्या या चर्चासत्रामध्ये संत बहिणाबाईंच्या साहित्यावर चर्चा होणार आहे .

त्यामध्ये डॉ. अशोक देशमाने यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चेत डॉ . राजेंद्र चौधरी, डॉ. प्रमोद कुमावत, ह.भ.प. विवेकानंद शास्त्री, डॉ. रेखा ढेरे, डॉ. बालासाहेब कटारे हे सहभागी होणार आहे. प्रा. बसवराज कोरे यांच्या अध्यक्षतेखाली शोध निबंध वाचन होणार आहे. मान्यवर अभ्यासक सहभागी होतील.

कार्यक्रमामध्येच डॉ. दत्तात्रय डुंबरे आणि डॉ. शिवाजी हुसे यांनी डॉ. सुभाष बागल यांच्या "संत तुकारामांचे अभंग ': एक चिंतन' या ग्रंथावर संपादित असलेल्या "तुकोबा : चिंतन आणि समीक्षा" या ग्रंथाचे प्रकाशनही होणार आहे. समोराप समारंभास सुप्रसिद्ध कवयित्री तथा लेखिका डॉ. वृषाली किन्हाळकर यांची उपस्थितीतरी लाभणार आहे. प्रमुख उपस्थितीत डॉ. दिलिप बिरुटे, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. सुखदेव पोटदुखे यांना निमंत्रित केले आहे.

या कार्यक्रमासाठी आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित, प्रमुख डाॅ. राम रौनेकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे , डॉ. दिपक राखुंडे, डॉ. लक्ष्मण गादगे, यांनी केले आहे.




## उमरगा तालुका अतिवृष्टी जाहीर करा बसव प्रतिष्ठानचे तहसीलदाराना निवेदन



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यात व मुरुम परिसरात सण २०२५ मध्ये सर्वत्र अतिवृष्टी जन्य पाऊस झाला आहे त्यामुळे शेतकरी आसमानी संकटात अडकले आहेत, काही ठिकाणी ढगफुटी झाली आहे,तालुक्यातील असंख्य शेतकऱ्याचे खरीप पिके पाण्यात आहेत.

काही ठिकाणी पंचनामा करणेही शक्य नाही त्यामुळे उमरगा तालुक्यातील सर्व महसूल मंडळाचा अतिवृष्टी मध्ये समावेस करावा ही विनंती, त्याचबरोबर सण २०२४ खरीप हंगामातील सोयाबीन अतिवृष्टी अनुदानातून मुरूम मंडळाला वगळण्यात आले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदाना पासून मुकावे लागले, तांत्रिक अडचणींचा बोजवरा शेतकऱ्यांवर ढकलून त्यांच्यावर अन्याय करू नका, मुरूम महसूल मंडळाचा सण २०२४ खरीप पिकांचा अतिवृष्टी मध्ये समावेश करून शेतकऱ्यांना अनुदान देऊन न्याय द्यावा अन्यथा बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून आंदोलन छेडण्यात येईल त्यास शासन जबाबदार राहील असा इशाराही देण्यात आला आहे.

वरील विषयावर गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कारवाई करून तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय द्याल ही अपेक्षा..मुरूम महसूल मंडळाला वारंवार जाणूनबुजून वगळ्यात येते याकडे लक्ष द्याल ही अपेक्षा असे निवेदनात म्हंटले आहे.

उमरगा तालुका अतिवृष्टी जाहीर करण्याची मागणी ईमेल द्वारे केली असून मुरूम महसूल मंडळाला जाणूनबुजून वारंवार वगळ्न्यात येते याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, तांत्रिक अडचणी मुळे मुरूम महसूल मंडळातील शेतकऱ्यांना २०२४ खरीप अनुदान मिळाला नाही तेही मंजूर करण्याची मागणी केली आहे, शेतकरी आसमानी संकटात हवालदिल झाला आहे, त्यामुळे पंचनामे नको सरसकट उमरगा तालुक्यातील सर्व महसूल मंडळात अतिवृष्टी जाहीर करावे...

**डॉ. रामलिंग पुराणे**
समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान

मुरूम महसूल मंडळाला जाणूनबुजून वारंवार अतिवृष्टी मधून वगळण्यात येते, मुरूम महसूल मंडळाकडे प्रशासनाचा दुर्लक्ष होत आहे...

**निर्मलकुमार लिमये,**
शेतकरी, मुरूम

## डॉ. प्रभाकर शेळके यांना गोंदण काव्य पुरस्कार



**जालना :** येथील ग्रामीण कवी कथाकार डॉ प्रभाकर शेळके यांना पुणे येथील,कुलस्वामिनी प्रतिष्ठान, पुणे संस्कृती, संस्कार, साहित्य काव्य, पर्यावरण संवर्धन प्रतिष्ठान आयोजित गोंदण दिपावली अंक, पुणे काव्यलेखन राज्यस्तरीय स्पर्धेत माती या कवितेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

98 अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. डॉ श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते सन्मानपत्र,स्मृतीचिन्ह रोख रक्कम देऊन हा सन्मान करण्यात येणार आहे.

या वेळी संपादक परिक्षक कवीराज दादाभाऊ गावडे, कामगार नेते अविनाश वाडेकर, जेष्ठ साहित्यिक कवी, राजेंद्र घावटे, अध्यक्ष डॉ नंदकुमार माळशिरसकर, बापुसाहेब जाधव, ज्ञानेश्वर खैरे, लक्ष्मण नलावडे,या मान्यवरांच्या साक्षीने गोंदण दिपावली अंकाचे प्रकाशन, निमंत्रित कवीचे कवी संमेलन व कथा काव्य लेखन पुरस्कार वितरण दिनांक २८ ससप्टेंबरला संपन्न होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५


## चष्मा पारखून घे

लेकरा
माझा चष्मा लावून
कदाचित दिसेल तुला जग
पण समजणार नाही.

माणसं वाचण्यात
गेलं अर्ध आयुष्यं माझं
तेव्हा कुठं गोल गोल माणसं
थोडीफार समजली.

तू तुझ्या चष्म्याने
हे विविधढंगी जग
विविधरंगी माणसं
वाचण्याबरोबर समजून घे.

तेव्हा कुठं लागेल टिकाव
अन् जगू शकशील समृद्ध जीवन.

स्वत:चा चष्मा ही पारखून घे
कारण इथं भंगार चष्मे
फुकटात वाटणाऱ्या
संधीसाधूची कमी नाही.


**ज्ञानेश्वर गायके..**
कन्नड
मो..9403384889


## बहिरगाव जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचा आगळावेगळा उपक्रम : १५० पर्यावरणपूरक बुकमार्कची निर्मिती




**बहिरगाव (प्रतिनीधी) :** जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव येथील विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती आणि पर्यावरण संवर्धन या दोन महत्त्वपूर्ण मूल्यांची सांगड घालत एक आगळावेगळा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी एकूण दीडशे बुक मार्क्स तयार केले.फुले, पाने, जुने कागद, वृत्तपत्राचे तुकडे, नैसर्गिक रंग अशा पर्यावरणपूरक साधनांचा वापर करून कलाशिक्षक सलिम आतार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे बुक मार्क्स साकारले.

प्रत्येक बुक मार्कमध्ये विद्यार्थ्यांची कल्पकता, निसर्गप्रेम आणि जिज्ञासावृत्ती ठळकपणे जाणवली. काही विद्यार्थ्यांनी सुंदर सुविचार व वाचनाविषयी घोषवाक्येही बुक मार्कवर लिहिली.आजच्या या कार्यक्रमाला सोनिया शिंदे (सहाय्यक वनसंरक्षक), जी. एस. सातपुते (वनक्षेत्रपाल), एस. पी. नलावडे (वनपाल), एन. के. घोडके (वनपाल), संध्या खाडे (वनरक्षक) व रुपाली राठोड (वनरक्षक) या मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.या प्रसंगी सहाय्यक वनसंरक्षक श्रीमती सोनिया शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

त्यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व सांगत वाचन संस्कृती आणि पर्यावरण यांची जोड देऊन उपक्रम अधिक प्रभावी बनविल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच "निसर्गातून शिकणे आणि वाचनातून ज्ञान घेणे हीच खरी प्रगती आहे," असा संदेश देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.तसेच पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेचे व पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक केले.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी एक स्मरणीय व प्रेरणादायी अनुभव ठरला.

उपक्राम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप शाळेतील शिक्षकवर्ग दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नुतन पवार ,सलिम आतार , शाम खोसरे, भास्कर भामरे, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुर्डे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे यांनी सहकार्य केले






## महाराजा अग्रसेन जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन





**कन्नड (अरुण थोरात):** सोमवारी संपन्न होणाऱ्या श्री छत्रपती महाराजा अग्रसेन जयंती निमित्त दि. २० नोव्हेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २२ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजऱ्या होणाऱ्या श्री छत्रपती महाराजा अग्रसेन जयंती निमित्त दि. छत्रपती महाराजा अग्रसेन उद्यान येथे अग्रवाल युवा मंच तर्फे रक्तदान शिबिर, नि:शुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू ऑपरेशन, श्री छत्रपती महाराजा अग्रसेन उद्यान सुशोभीकरण व वृक्षारोपण आदी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले.

या उपक्रमात समाजबंधूंनी उत्साहाने सहभाग घेतला. यात १२३ लोकांनी रक्तदान केले, त्यात ११८ पुरुष व ०५ महिला सहभाग घेतला तसेच १२३ लोकांनी नेत्र तपासणी केलीया वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, भाजपा नेते व उद्योजक मनोज केशवराव पवार, अग्रवाल युवा मंच चे रुपेश भारुका, रोहित पिरथानी, गोविंद भारुका, संगेश भारुका, जिल्हाध्यक्ष भाजपा व्यापारी आघाड़ी संभाजीनगर प्रशांत अग्रवाल, विकास भारुका, विजय अग्रवाल, करण भारुका, अरुण भारुका, तेजस भारुका, संजय वर्मा, सुशांत भारुका, समित भारुका व अग्रवाल महिला मंडलची अर्चना ओ. भारुका, माधुरी भारुका, प्रणिता भारुका, अंजू पिरथानी, कीर्ति भारुका, सुनंदा भारुका, शोभा भारुका, अर्चना भारुका, राधा भारुका, वैशाली भारुका, शीतल भारुका, दीप्ति भारुका, मोनिका भारुका व समस्त समाज बाऔधव उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५


## गुणवंत खेळाडू तयार होण्यासाठी विशेष प्रयत्न करणार : प्रवीण शिंदे



**छत्रपती संभाजीनगर :** खेळाडूंना प्रोत्साहन देण्याबरोबरच युवा पिढीमध्ये खेळाची रूची वाढावी यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे.त्याचबरोबर राज्यात गुणवंत खेळाडू तयार होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणार असून छत्रपती संभाजी नगर हॉलीबॉल संघटनेचे सदस्य मार्गदर्शक प्रवीण शिंदे यांनी आज सांगितले.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा कृष्णा इंटरनॅशनल स्कूल येथे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धा जिल्हा क्रीडा कार्यालय व कृष्णा इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आल्या होत्या तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धेत वयोगट १४ १७ १९ व मुली १४ १७ १९ वयोगटाचे सामने कृष्णा इंटरनॅशनल येथे संपन्न झाले.या स्पर्धेत एकुण ३४ संघांनी आपला सहभाग नोंदवला.

यावेळी क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी कृष्णा इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष सचिन पवार, शाळेच्या मुख्य प्रमुख वसुंधरा पवार क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे राकेश निकम आधी उपस्थित होते या स्पर्धेचे पंच म्हणून विशाल दांडेकर एज जा शहा करण राठोड वसीम शेख रवी कुमार सोनकांबळे राहुल दानके शेख कडुबा चव्हाण आधुनिक कार्य केले






## स.भु. महाविद्यालयात सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि शैक्षणिक लेखन कौशल्ये राष्ट्रीय कार्यशाळेला सुरुवात




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** सामाजिक शास्त्रातील अभ्यास हा एखाद्या नोकरीपुरता मर्यादित नसून विविध क्षेत्रातील सखोल ज्ञान मिळविण्याचा मार्ग आहे. माहितीपेक्षा ज्ञान हे महत्वाचे असून जीवन जगण्यासाठीची आवश्यक कौशल्य ही सामाजिक शास्त्राच्या चिंतनातून प्राप्त केले जाऊ शकतात. अलीकडे मानवी जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचे बनत असून मानवासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. हे आव्हान पेलण्याची ताकद सामाजिक शास्त्रामध्ये आहे.

सौहार्दपूर्ण जीवन जगण्यासाठी शांततामय वातावरणाची गरज आहे ही गरज सामाजिक शास्त्रे पूर्ण करतात असे प्रतिपादन इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटीच्या अध्यक्षा, ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. मैत्रेयी चौधरी यांनी आपल्या बीजभाषण प्रसंगी केले आहे.स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि इंडियन सोशियॉलॉजिकल सोसायटी, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सामाजिकशास्त्रे संशोधन व शैक्षणिक लेखन' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी बीज भाषणात त्या बोलत होत्या.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरोदे, स. भु. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील,राज्यपाल प्रतिनिधी गजानन सानप यांची उपस्थिती होती.प्रारंभी प्राचार्य मिरगणे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमाचा आढावा घेतला.

कार्यशाळेचे आयोजक प्रा.संदीप चौधरी यांनी कार्यशाळा आयोजित करण्यामागची भूमिका विशद केली. सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि लेखन शैक्षणिक वाटचालीसाठी उपयुक्त असून ध्यानाच्या निर्मितीमध्ये त्याचे महत्त्वाचे योगदान आहे सामाजिक शास्त्रात लेखन व पद्धतीशास्त्राची एक शिस्त निर्माण करण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरेल असे ते म्हणाले.

प्र-कुलगुरू प्रो. वाल्मीक सरोदे म्हणाले की, संशोधनाचा दर्जा उंचावण्याची गरज असून त्यासाठी संशोधकांनी परिश्रम घेण्याची तयारी ठेवावी. नुसती माहिती गोळा करून संशोधन पूर्ण होत नाही तर गुणात्मक डेटा गोळा करून संशोधनाचे निष्कर्ष काढले पाहिजे असे संशोधन समाजाच्या हितासाठी उपयुक्त ठरते गुणवत्तापूर्ण संशोधनच समाजाचे प्रश्न सोडवू शकते संशोधनासाठी आता भाषा हा अडसर राहिला नाही.

मातृभाषेतूनही अव्वल दर्जाची संशोधन आपणाला करता येऊ शकते संशोधकांनी त्यासाठी शॉर्टकट वापरू नये कॉपी-पेस्ट संशोधनामुळे आपली प्रगती होणार नाही प्रॉपर डेटा मिळवून निष्कर्ष काढले पाहिजेत संशोधनाचा दर्जा राखण्यासाठी राखण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. नव्या शैक्षणिक धोरणात संशोधनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

सामाजिक शास्त्रात अनेक संधी आहेत मात्र त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.याच सत्रात हैदराबाद सेंट्रल विद्यापीठाच्या प्रा.अजैलियू निउमाई यांनी आपले विचार व्यक्त केले. उत्तम बीज उगवण्यासाठी जमिनीची उत्तम मशागत करावी लागते त्याच प्रकारे संशोधनाचे असते. संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबीची त्यांनी यावेळी चर्चा केली.

दुपारच्या सत्रात लखनऊ विद्यापीठाचे डॉ. विनोद चंद्रा यांनी गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या विविध पैलूंचा परामर्श घेतला. यावेळी संस्थेच्या सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर यांनी कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्यात.संयोजक प्रा. संदीप चौधरी यांनी उपस्थित संशोधकाचे आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५

## शरणापूर भांगसी माता गडावर शारदीय नवरात्र उत्सव



**दौलताबाद (प्रा. शिवाजी गायकवाड) :** शरणापूर भांगसी माता गडावर शारदीय नवरात्र उत्सव ऐतिहासिक भांगशी गडावर भव्य असे मंदिर असून याठिकाणी नवरात्र उत्सव चे आयोजन २२ सप्टेंबर पासून ०१ ऑक्टोबर पर्यंत आयोजित करण्यात येत आहे.

"नाही केली भांगशी तर देवा काय सांगशी"अशी म्हण ग्रामीण भागात प्रचलित असून त्या म्हणी प्रमाणे परिसरातील भाविक वर्षातून एकदा तरी भांगसी मातेच्या दर्शनासाठी पायी वारी करतातयानिमित्ताने विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

त्यात महोत्सवानिमित्त भांगसी गडावर जपानुष्ठान माता भव्य व नवचंडी यज्ञाला गुरुवारी (दि. ०१) सुरुवात होणार आहे.दि ०१ ऑक्टोबर बुधवारी सकाळी ०८ दुपारी १२.३० वाजेपर्यंत नवचंडी यज्ञ चालणार आहे.नंतर महामंडलेश्वर परमानंदगिरी महाराज यांचे प्रवचन व महाप्रसाद होईल. दैनिक धार्मिक कार्यक्रमामध्ये, जपानुष्ठाना व्यतिरिक्त दररोज पहाटे ५ ते सकाळी ७ वाजेपर्यंत प्रवचन, आरती होईल.सायंकाळी ७ वाजता श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरी महाराज यांचे प्रवचन होईल.

ज्यांना नवचंडी यज्ञपूजेत सहभाग घ्यायचा आहे त्यांनी तत्काळ आश्रम व्यवस्थापनाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री स्वामी परमानंदगिरी महाराज यांनी केले आहे.अनुष्ठानास येताना ताट, तांब्या, अंथरूण, टॉवेल, बॅटरी व इतर आवश्यक साहित्य सोबत घेऊन यायचे आहे असे व्यवस्थापक सांडू पवार यांनी सांगितले आहे

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## इतर समाजांना अनुसूचित जमातीत प्रवेश दिल्यास तीव्र आंदोलन करू



**कन्नड (अरुण थोरात):** बंजारा, धनगर व इतर कोणत्याही समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट केल्यास जिल्हाभरात आंदोलने करण्याचा इशारा गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष पांडू कडाळे, उपाध्यक्ष अलका मेंगाळ, सचिव पुजा पथवे यांनी दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे.

याबाबत दि. २० नोव्हेंबर रोजी तहसीलदार कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संविधानाच्या कलम ३४२ नुसार अनुसूचित जमती ची यादी भारत सरकारने जाहीर केली आहे. त्या यादीत समाविष्ट असलेल्या जमातींनाच 'अनुसूचित जमाती' म्हणून कायदेशीर मान्यता आहे. या यादीत नसल्याल्या ईतर कोणत्याही समाजाला आदिवासी म्हणून आरक्षणाचा लाभ मिळू शकत नाही. आदिवासी समाज ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत वंचित राहिला आहे. आमचा समाज शिक्षण, नोकरी व्यवसायाच्या क्षेत्रात हळूहळू पुढे सरकत आहे.

संविधानाने आम्हाला दिलेल्या आरक्षणामुळे आमच्या मुलां मुलींना शिकण्याची, नोकरी मिळण्याची व समाज उभारणीची संधी मिळात आहे. परंतु अलीकडच्या काळात काही प्रस्तापित समाज आदिवासी समाजाच्या आरक्षणात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. हा प्रकार सामाजिक अन्यायकारक असून संविधानिक तरतूदींना ही विरोध करणारा आहे.

जर इतर समाजांना आदिवासी आरक्षण दिलेगेले तर मूळ आदिवासी समाजाचे शिक्षण, नोकरी, जमिन व विकासाच्या संधी हिरावून घेतल्या जातील हे आमच्या पूढील पिढ्यांच्या अस्तित्वावर गंभीर संकट आणणारे आहे. तरी बंजारा, धनगर इतर कोणत्याही समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात येऊ नये.

जर शासनाने राजकीय उद्देशाने समाविष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास छत्रपती संभाजीनगर जिल्हातील आदिवासी ठाकर समाजाच्या वतीने उपोषणे, मोर्चे, आंदोलने करण्यात येईल असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.याप्रसंगी सुधाकर मेंगाळ, भावडू मेंगाळ, राजेंद्र आगीवले, पांडू मधे, गंगाराम मेंगाळ, सरिचंद दोरे, माधव उघडे, नथ्थू गांगड, रघूनाथ कातवारे, बुधा मधे, बाळू मेंगाळ चिवळी, विठ्ठल गावंडे, श्रावण गावंडे, दामू उघडे, सोमनाथ उघडे, लक्ष्मण मेंगाळ आदी उपस्थित होते.

## गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवाभावी संघटनेने आदिवासी आरक्षणात इतर जातींना विरोध असल्याचे तहसीलदारांना दिले निवेदन

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कन्नड तालुक्यातील तहसीलदारांना दिले निवेदन मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटच्या दाखल्यावरून कुणबी मराठा म्हणून आरक्षणाचा शासन निर्णय मिळाल्यानंतर बंजारा धनगर समाज देखील अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट व्हावा अशी मागणी करीत आहे.

या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजात तीव्र असंतोष पसरला असून या मागणीला आळा घालण्यासाठी गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व आदिवासी बांधव पुढे आला आहे आदिवासी समाजा हा ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत वंचित राहिला आहे आदिवासी ठाकर भिल्ल व आदिवासी जमातीतील सर्व समाज हा शिक्षण नोकरी व्यवसायाच्या क्षेत्रात हळूहळू पुढे सरकत आहे मूळ आदिवासी समाजाचे शिक्षण नोकरी जमीन व विकासाच्या संध्या हिरावून घेतल्या जातील आदिवासी समाजासाठी असलेल्या आरक्षित प्रवर्गात इतर कोणत्याही जातींचा किंवा समाजाचा समावेश करू नये अशी मागणी कन्नड व खुलताबाद तालुक्यातील सर्व आदिवासी बांधवांनी केली आहे.

या मागणीसाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता गिरणी ग्राउंड ते तहसील कार्यालय कन्नड असा आदिवासी बचाव एल्गार मोर्चा काढण्यात येईल असे तहसीलदारांना निवेदनात दिले आणी काही समाज, जाती बेकायदेशीरपणे आदिवासी आरक्षणात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत शासनावर दबाव आणून अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट होण्याच्या त्यांचा प्रयत्न आहे.

या प्रकारच्या कोणत्याही प्रयत्नांना तीव्र विरोध असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे जर शासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केले आणि इतर जातींना आदिवासी आरक्षणात समाविष्ट केले तर संघटनेतर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

निवेदन सादर करताना पांडू कडाळे, सुधाकर मेंगाळ, संजय सोनवणे, विलास मोरे, अशोक माळे, गंगाराम मेंगाळ तुकाराम मेंगाळ पांडूरंग मधे कचरू सावंत गंगाराम अगिवाले, धर्मा मधे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि आदिवासी बांधव उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५


## साहित्य समाज जोडण्याचे काम करते : डॉ. अनिलकुमार राठोड



**उमरगा** : साहित्यातुन समाजाचे दुःख कमी करण्याचे, समाजाला मानवतावादाचा संदेश देण्याचे आणि समाजातील माणसांना परस्परांशी जोडण्याचे काम साहित्यातून होते असे प्रतिपादन लातूर येथील डॉ. अनिलकुमार राठोड यांनी केले.

ते काल शनिवार २० सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात हिंदी पखवाडा निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. प्राचार्य डॉ. संजय अस्वले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. डी. बी. ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात हिंदी दिवसानिमित्त हिंदी पखवाडा साजरा केला जात आहे.

यावेळी बोलताना डॉ. अनिलकुमार राठोड यांनी आदिकाल, रीतिकाल, भक्तिकाल आणि आधुनिक काळातील साहित्याचे संदर्भ देत भाषा समाजाला कसे समृध्द करते याचे दाखले देत समाजाच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम भाषा आणि साहित्य करते आणि हिंदी साहित्यातून रोजगाराच्या उपलब्ध संधी विषयी माहिती दिली.

प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी हिंदी भाषा आणि साहित्य कसे उपयुक्त आहे, याविषयी मार्गदर्शन केले.याप्रसंगी हिंदी विभागातील डॉ. सुभाष इंगळे, डॉ. सन्मुख मुच्छटे, डॉ. ज्ञानेश्वर चित्तमपल्ले, प्रा. प्रशांत साळुंके, प्रा. गुरुनाथ पाटील, प्रा. अनिल चव्हाण, प्रा. दयानंद जाधव आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सन्मुख मुच्छटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बीना लोकरे यांनी केले तर प्रा. अनिल चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## माधवराव पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : नगर शिक्षण विकास मंडळ संचलित श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात शिक्षण महर्षी माधवराव (काका) पाटील यांच्या नावाने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण शुक्रवारी (ता. १९) रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे होते.

याप्रसंगी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सादक वली, परीक्षक डॉ. संजय बिराजदार, डॉ. विवेकानंद वावळे, डॉ. किरण राजपूत, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील तेजस पाटील व वरूण घरटे (प्रथम) रोख ११००१ रुपये, वारजे माळवाडी, पुणे येथील कला, वाणिज्य महाविद्यालयातील नितीन गागरे व रोहन कवडे (द्वितीय) रोख ७००१ रुपये, निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील कु. गीता वाडकर व कौशल्या बेलकुंदे (तृतीय) रोख ५००१ रुपये, मुरुमच्या श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील हिराबाई सोलापूरे (उत्तेजनार्थ) रोख २००१ रुपये, उमरगा येथील श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयातील नौशिन सास्तुरे (उत्तेजनार्थ) रोख २००१ रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. संजय बिराजदार यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आजचा काळ हा स्पर्धात्मक आहे.

प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. तंत्रज्ञानाच्या युगात तुमच्यासमोर असलेल्या संधी अमर्याद आहेत, पण त्या प्राप्त करण्यासाठी कष्ट, शिस्त आणि प्रामाणिक प्रयत्न हे तुमच्या हातात आहे.

तुमचं ध्येय ठरवा, त्याच्यासाठी झटत राहा. यशाचा मार्ग कधीच सोपा नसतो, पण मेहनतीच्या जोरावर यश निश्चित मिळवता येते. अध्यक्षीय समारोप डॉ. अशोक सपाटे यांनी केला.

याप्रसंगी स्पर्धेत सहभागी झालेल्या कु. गीता वाडकर, मनिषा जांगीड, नितीन गागरे, डॉ. सुदर्शन पिडगे आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. गोपाळ कुलकर्णी, प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. रमेश आडे, डॉ. मुकुंद धुळेकर, डॉ. राजेंद्र गणपूरे, डॉ. प्रकाश कुलकर्णी, डॉ. सुजित मटकरी, डॉ. अविनाश मुळे, डॉ. विनायक रासुरे, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. रवींद्र गायकवाड, प्रा. अजिक्य राठोड, राजू ढगे, एम. सी. पाटील, प्रभाकर महिंद्रकर, लालअहमद जेवळे आदींनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार प्रा. डॉ. नागोराव बोईनवाड यांनी मानले. यावेळी विविध महाविद्यालयाचे स्पर्धक, विविध शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.







महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २१ सप्टेंबर २०२५

# अल्झायमर : वृद्धावस्थेशी निगडीत प्रमुख आजार

जागतिक अल्झायमर दिन दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस फक्त अल्झायमर या रोगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यापुरता नाही, तर त्या आजारामुळे प्रभावित होणाऱ्या रुग्ण, त्यांच्या कुटुंबीय आणि संपूर्ण समाजावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकण्याचे उद्दिष्टही ठेवतो. जगभरातील वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढत असल्याने प्रत्येक समाजाच्या आरोग्य व्यवस्थेवर वृद्धत्वाशी निगडीत आजारांचा प्रभाव वाढतो. वैद्यकीय विज्ञानाने प्रगती केली, औषधोपचार सुधारले आणि जीवनमान वाढले, परंतु वृद्धावस्थेशी निगडीत आजारांचा प्रश्न आता गंभीर सामाजिक आणि आरोग्यविषयक समस्या बनला आहे.

वृद्धत्व ही जीवनातील नैसर्गिक अवस्था असली तरी अल्झायमर सारख्या मेंदूशी संबंधित आजारामुळे वृद्धांचे जीवन, त्यांच्या कुटुंबाचे आणि समाजाचे जीवन प्रभावित होते. या आजाराचा केवळ वैद्यकीय दृष्टिकोन पुरेसा नाही; त्याचे सामाजिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलूही तितकेच महत्त्वाचे आहेत. अल्झायमर हा डिमेन्शियाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. डिमेन्शिया म्हणजे स्मरणशक्ती, निर्णयक्षमता, संवाद कौशल्य आणि दैनंदिन कामकाज करण्याच्या क्षमतेत हळूहळू होणारी घट होय. सुरुवातीला लक्षणे सौम्य असतात, परंतु कालांतराने ती गंभीर होतात आणि रुग्ण पूर्णपणे इतरांवर अवलंबून राहतो. या प्रक्रियेमुळे रुग्णाबरोबरच कुटुंबीयांवरही मानसिक, भावनिक आणि आर्थिक ताण येतो.

अल्झायमरचा इतिहास पाहिला तर हा विकार प्रथम १९०६ मध्ये जर्मनीतील डॉ. ॲलॉईस अल्झायमर यांनी ओळखला, ज्यांच्या नावावरून हा आजार ‘अल्झायमर’ म्हणून ओळखला जातो. त्या काळात हा आजार दुर्मिळ मानला जात असे, परंतु आजच्या घडीला कोट्यवधी लोक या विकाराने प्रभावित आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार दर तीन सेकंदाला एक नवीन डिमेन्शिया रुग्ण वाढतो आणि त्यातील बहुसंख्य रुग्ण अल्झायमरने ग्रस्त असतात.

अल्झायमर हा वृद्धत्वाशी निगडीत रोग असला तरी त्याची कारणे अनेक आहेत. वाढलेले वय सर्वात महत्त्वाचे कारण मानले जाते; ६५ वर्षांनंतर या आजाराचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. आनुवंशिकता, मेंदूत होणारे रासायनिक बदल, उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलता, अस्वास्थ्यकर जीवनशैली, मानसिक तणाव, व्यायामाचा अभाव यासारखे घटक देखील या आजारास कारणीभूत आहेत. स्त्रियांमध्ये अल्झायमरचे प्रमाण अधिक असल्याचे आढळले आहे.

अल्झायमरची सुरुवातीची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अल्पकालीन स्मरणशक्ती कमी होणे, वारंवार गोष्टी विसरणे, संवादात अडथळे येणे, वेळ व ठिकाण याची जाणीव हरवणे, दैनंदिन कामांमध्ये अडचण, व्यक्तिमत्त्वात बदल, चिडचिड वाढणे आणि सामाजिक संपर्क टाळणे ही काही मुख्य लक्षणे आहेत. अनेकदा कुटुंबीय या लक्षणांना ‘वृद्धत्वाचा नैसर्गिक भाग’ मानून दुर्लक्ष करतात, ज्यामुळे रुग्ण वेळेत वैद्यकीय मदत घेऊ शकत नाही.

अल्झायमरचा सामाजिक परिणाम अत्यंत गुंतागुंतीचा आहे. रुग्णाचा वैयक्तिक आत्मसन्मान कमी होतो, तर कुटुंबीयांवर त्याची काळजी घेण्याचा बोजा येतो. पारंपरिक भारतीय समाजात वृद्धांची काळजी घेणे नैसर्गिक जबाबदारी मानली जाते, परंतु शहरीकरण, औद्योगिकीकरण, स्थलांतर, संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास आणि महिलांची रोजगार क्षेत्रातील वाढती भागीदारी यामुळे ही जबाबदारी कठीण झाली आहे. अनेकदा रुग्णांना दुर्लक्ष, उपेक्षा किंवा मानसिक ताण सहन करावा लागतो.

भारतासारख्या विकसनशील देशात, जिथे वृद्धांची संख्या झपाट्याने वाढत आहे, अल्झायमर गंभीर सार्वजनिक आरोग्याचे आव्हान बनले आहे. ग्रामीण भागात स्मृतिभ्रंशाविषयी माहिती कमी असल्यामुळे निदान उशिरा होते. रुग्ण आणि कुटुंबीय यांना उपचार, पुनर्वसन, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्य मिळवणे कठीण होते. अल्झायमरवर कायमस्वरूपी औषध उपलब्ध नाही. काही औषधांनी लक्षणे कमी होतात किंवा आजाराची प्रगती मंदावते, परंतु पूर्ण बरे करणे शक्य नाही. जीवनशैलीत बदल, मेंदू सक्रिय ठेवणे, व्यायाम, संतुलित आहार, सामाजिक सहभाग आणि मानसिक तणाव टाळणे या प्रतिबंधात्मक उपायांना महत्त्व आहे.

लवकर निदान आणि योग्य काळजी घेतल्यास रुग्णाची स्वावलंबनशक्ती टिकवता येते. अल्झायमरग्रस्त रुग्णाची काळजी घेणे कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर मोठा प्रश्न ठरतो. संयम, सहानुभूती, समजूतदारपणा आणि आधार देणे आवश्यक आहे. रुग्णाच्या भावनिक गरजांकडे लक्ष देणे, सुरक्षित वातावरण निर्माण करणे आणि साध्या गोष्टींमध्ये मदत करणे याने त्याचे जीवनमान सुधारते.

जागतिक अल्झायमर दिनाच्या निमित्ताने रुग्ण व कुटुंबीयांना मार्गदर्शन, समुपदेशन आणि मानसिक आधार दिला जातो. समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात. या दिवशी समाजाला स्मरण करून दिले जाते की स्मृतिभ्रंश हा वृद्धत्वाचा नैसर्गिक भाग नाही, तर वैद्यकीय दृष्टिकोनातून गंभीर आजार आहे.

अल्झायमरला समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर वृद्धांचा सन्मान, कुटुंबीयांची जबाबदारी, समाजातील वृद्धांची भूमिका आणि आर्थिक व्यवस्था यांचा समन्वय आवश्यक आहे. आधुनिक शहरी जीवनात वृद्धांचा एकटेपणा वाढत चालला आहे, त्यामुळे अल्झायमरग्रस्त वृद्धांना योग्य काळजी, आधार आणि सन्मान मिळणे गरजेचे आहे. भविष्यात वृद्धांची संख्या झपाट्याने वाढणार असल्यामुळे अल्झायमरविरुद्धची लढाई अधिक कठीण होईल.

आरोग्य व्यवस्थेत सुधारणा, वैद्यकीय संशोधन, तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका, पुनर्वसन केंद्रे, वृद्धांसाठी समुदायाधारित उपक्रम, आर्थिक सहाय्य आणि शासनाची धोरणे या सर्व गोष्टींची गरज आहे. समाजाने, कुटुंबाने आणि शासनाने मिळून वृद्धांचा आत्मसन्मान टिकवणे ही खरी मानवतेची ओळख आहे.

अल्झायमर आजाराच्या व्यवस्थापनात वैद्यकीय उपचार, कौटुंबिक काळजी, समाजातील जागरूकता आणि सार्वजनिक धोरणे यांचा समन्वय आवश्यक आहे. औषधोपचाराबरोबरच जीवनशैलीतील बदल, नियमित व्यायाम, संतुलित आहार, मानसिक आणि बौद्धिक सक्रियता, सामाजिक सहभाग या उपाययोजना प्रभावी ठरतात. कुटुंबीयांनी संवाद साधणे, छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे यामुळे रुग्णाची मानसिक स्थिती सुधारते.

अल्झायमरग्रस्त रुग्णासाठी विशेष सुविधा असलेल्या केंद्रांची गरज वाढली आहे. जागतिक पातळीवर अनेक देशांमध्ये रुग्णालयीन उपचार, पुनर्वसन केंद्रे, समुपदेशन सेवा आणि सामाजिक सहाय्य पुरवली जाते. भारतात ही सुविधा मर्यादित आहे, विशेषतः ग्रामीण भागात. त्यामुळे रुग्णांना आणि कुटुंबीयांना योग्य मदत मिळवणे कठीण होते.

शासकीय धोरणांत वृद्धांसाठी अल्झायमर केंद्रे, प्रशिक्षण घेतलेल्या परिचारिका, मानसिक आधार कार्यक्रम आणि आर्थिक सहाय्य यांचा समावेश केला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर अल्झायमरमुळे वृद्धांचा आत्मसन्मान धोक्यात येतो. समाजाने वृद्धांना केवळ ‘आयुष्याचा संपलेल्या टप्प्याचा भाग’ म्हणून न पाहता, त्यांना मानवी हक्क, सन्मान आणि स्वतंत्र अस्तित्व मिळावे, याची काळजी घेतली पाहिजे.

जागतिक स्तरावर अल्झायमरवर संशोधन जोरदारपणे चालू आहे. अनेक देशांमध्ये मेंदूच्या न्यूरॉन्सच्या हानीसंबंधी जीववैज्ञानिक अभ्यास सुरू आहेत, ज्यामुळे भविष्यात अल्झायमरवर प्रभावी उपचार किंवा प्रतिबंधात्मक उपाय उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. अनेक नवीन औषध आणि न्यूरोप्रोटेक्टिव्ह तंत्रज्ञानावर प्रयोग सुरु आहेत, ज्यामुळे मेंदूतील पेशींचा नाश रोखता येऊ शकतो. भारतातही अल्झायमरविषयी संशोधन आणि जागरूकता वाढत आहे.

अल्झायमरग्रस्त रुग्णाच्या दैनंदिन जीवनासाठी कौटुंबिक आणि सामाजिक आधार महत्त्वाचा आहे. रुग्णासाठी सुरक्षित आणि समजूतदार वातावरण तयार करणे, त्यांना मानसिक आणि शारीरिक सहाय्य देणे, रोजच्या जीवनात साध्या गोष्टींमध्ये मदत करणे आवश्यक आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, वृद्धांचे योगदान, अनुभव आणि ज्ञान यांचा आदर राखणे ही समाजाची जबाबदारी आहे.

आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, अल्झायमरग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांवर मोठा भार येतो. रुग्णाच्या देखभालीसाठी वेळ खर्च, औषधोपचार, पुनर्वसन आणि विशेष सुविधा यासाठी खर्च करावा लागतो. भारतासारख्या देशात, जिथे आरोग्य विमा आणि वृद्धांची आर्थिक सुरक्षा अपुरी आहे, अशा परिस्थितीत अल्झायमरविषयक आर्थिक धोरणे अत्यंत महत्त्वाची ठरतात. सरकारने वृद्धांसाठी आर्थिक सहाय्य, विमा योजना आणि समाजाभिमुख कार्यक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

जागतिक अल्झायमर दिनाचे उद्दिष्ट केवळ रुग्ण आणि कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचवणे नाही, तर समाजातील संवेदनशीलता वाढवणे आणि अल्झायमरविषयी गैरसमज दूर करणे देखील आहे. विविध देशांमध्ये या दिवशी शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने, मीडिया मोहिमा आणि जनजागृती उपक्रम राबवले जातात. या उपक्रमांमुळे समाजातील सर्व स्तरांवर अल्झायमरविषयी माहिती पोहोचते, सहानुभूती वाढते आणि रुग्ण व कुटुंबीयांसाठी आवश्यक संसाधने उपलब्ध होण्याची जाणीव निर्माण होते.

निष्कर्षतः असे म्हणता येईल की, अल्झायमर हा वृद्धावस्थेशी निगडीत गंभीर आजार आहे. त्याचा प्रभाव रुग्णावर, कुटुंबीयांवर, समाजावर आणि आर्थिक व्यवस्थेवर होत असतो. वैद्यकीय, सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक उपाययोजना केल्यास रुग्णाचा जीवनमान सुधारू शकतो, कुटुंबीयांचा ताण कमी होतो आणि समाजातील जागरूकता वाढते. अल्झायमरविरुद्धची लढाई फक्त औषधोपचारापुरती मर्यादित नाही; ती समाज, कुटुंब, आरोग्य संस्था आणि शासन यांच्या एकत्रित प्रयत्नांची लढाई आहे. जर समाजाने वृद्धांचा आत्मसन्मान टिकवला, त्यांना सुरक्षित आणि सन्मानासह जीवन जगण्याची संधी दिली, तर अल्झायमरग्रस्त रुग्णांचे जीवनमान सुधारले जाऊ शकते आणि समाज अधिक संवेदनशील व सहानुभूतिशील बनेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल —**
**bagate.rajendra5@gmail.com**